## १) सार्वजनिक आरोग्य : सद्यस्थिती

- १९९० साली एकूण राष्ट्रीय उत्पादनाच्या १.३ टक्के एवढा खर्च आरोग्यासाठी होत होता. हेच प्रमाण १९९९ साली फक्त ०.९ टक्क्यावर आले होते. केंद्रीय अर्थ संकल्पाच्या १.३ टक्के व राज्य अर्थसंकल्पाच्या ५.५ टक्के इतका खर्च आरोग्य कार्यक्रमासाठी होत आहे.
- आरोग्य सेवांच्या एकूण खर्चापैकी १५ टक्के केंद्रशासन व ८५ टक्के राज्य शासन करीत आहे.
- कुटुंब कल्याण कार्यक्रम व इतर आरोग्य कार्यक्रम यांचा समन्वय सध्या खूपच कमी आहे.
- आरोग्य कार्यक्रम अंमलबजावणीत समाजाचा सहभाग खूपच कमी असल्यामुळे, या कार्यक्रमाची कार्यक्षमता व परिणामकारिता खूपच कमी झालेली आहे.
- सध्या पोषण, परिसर स्वच्छता, सुरक्षित पाणीपुरवठा याबाबतच्या धोरण अंमलबजावणीत आवश्यक ती सुसुत्रता व



समन्वय नाही.

- विभागीय अनुशेषाचे प्रमाण खूप मोठे आहे.
- लोकसंख्यावाढीचा प्रश्न अद्यापही ज्वलंत आहे.
- गरीबांना अद्यापही आरोग्य सेवा सहजासहजी उपलब्ध नाहीत.
- आरोग्य विम्याचे संरक्षण फक्त १० टक्के जनतेला आहे.
- एखादी व्यक्ती रूग्णालयात दाखल झाल्यास मोठ्या प्रमाणावर खर्च येतो. यासाठी बऱ्याच वेळेला मोठ्या प्रमाणावर उसनवारी करावी लागते वा स्वत: जवळची चीजवस्तु विकावी लागते.

